महाराष्ट्र शासन

क्रमांक :- वहका-२०१४/प्र. क्र. ९४/ का.१४
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-३२.
दिनांक : १८ जुलै, २०१४.

प्रति,

१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२) सर्व जिल्हाधिकारी,
३) सर्व उपविभागीय अधिकारी

विषय :- अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ च्या अंमलबजावणीबाबत.
कमी क्षेत्राच्या अपिल दाव्यांबाबत मार्गदर्शन..

महोदय,

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ मधील तरतूदींच्या अनुषंगाने दावेदारांने मागणी केलेले क्षेत्र व प्रत्यक्षात अंतिम मान्य झालेले क्षेत्र यामध्ये तफावत असल्याच्या बऱ्याचश्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत. तसेच दावेदारांचा दावा / अपिल फेटाळतांना अधिनियम व नियमाच्या तरतूदींनुसार विहित प्रक्रीय अवलंबविली गेली नसल्याबाबतही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्रकरणी दावा निकाली काढण्याच्या प्रक्रीयेबाबत संदिग्धता राहू नये. याकरिता अंमलबजावणी प्राधीकरणांनी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ मधील तरतुदींनुसार तसेच सुधारित नियम, २०१२ मधील नियम क्र. १२ नुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ मधील तरतूदींनुसार जिल्हास्तरिय वनहक्के समितीने दावे किंवा अपिल यावर दिलेला निर्णय अंतिम व बंधनकारक आहे. सदर निर्णयामुळे व्यथित झालेल्या व्यक्तींस अपिल करण्याची अधिनियमात तरतूद नाही. तथापि, उपविभागीय किंवा जिल्हास्तरिय वनहक्क समितीच्या निर्णयामध्ये अनुक्रमे ग्रामसभेच्या किंवा उपविभागीयस्तरिय समितीने केलेल्या शिफारशीमध्ये फेरबदल अथवा फेटाळणे यांचा समावेश असेल तर असे फेरबदल / फेटाळण्याची सविस्तर कारणे नमूद करुन बाधीत व्यक्तीला लेखी कळविणे गरजेचे आहे. ग्रामसभेचा / उपविभागीय स्तरीय समितीचा निर्णय अथवा शिफारस अपूर्ण असल्याचे अथवा प्रथमदर्शनी जास्तीची तपासणी करणे आवश्यक आहे असे आढळल्यास यथास्थिती उपविभाग स्तरिय समिती अथवा जिल्हास्तरिय समिती अशा दाव्यात फेरबदल करण्याऐवजी किंवा तो फेटाळण्याऐवजी यथास्थिती ग्रामसभेकडे / उपविभागीय स्तरीय समितीकडे पुर्नविचारार्थ पाठविण्याची तरतूद वनहक्क कायदा सुधारित नियम २०१२ मधील कलम १२ क नुसार आहे. तसेच कलम ६ नुसार बाधीत व्यक्तीला त्याच्या दाव्याच्या / अपिलांच्या संबंधात कोणतीही बाब सादर करण्यासाठी वाजवी संधी दिल्याखेरीज त्यांचे अपिल / दावा निकाली काढता येणार नाही.

Generated by CamScanner

वनहक्क कायद्याअंतर्गत दावा / अपिल दाखल करुन अंतिमत: मंजूर वा नामंजूर करण्याची प्रक्रीया ग्रामस्तरीय वनहक्क समिती, उपविभागीय स्तरीय समिती व जिल्हास्तरीय समिती अशा तीन स्तरावर राबविली जाते. जिल्हास्तरीय समिती ही कलम ३(१) खालील दावेदाराने सादर केलेला दावा निकाली काढण्याबाबत अंतिम प्राधिकरण आहे. जिल्हास्तरीय समितीने दावा निकाली काढण्यापुर्वी ग्रामस्तरीय वनहक्क समिती व उपविभागीय स्तरीय समिती यांनी वनहक्क कायद्याच्या अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार दावा तपासण्याची विहीत प्रक्रिया पार पाडली आहे किंवा कसे? याची पूर्ण तपासणी करूनच दावा अंतिमत: निकाली काढणे आवश्यक आहे. दावा अंतिम निकाली काढण्यापूर्वी विहीत प्रक्रियेतील एखादा टप्पा वरील त्रिस्तरावरील वनहक्क समितीकडून पार पडला नसेल तर अशा प्रकरणात अधिनियमातील तरतुदीनुसार सदर दावा निकाली काढलेला नाही, असे स्पष्ट होते. ज्या प्रकरणांमध्ये जिल्हास्तरीय समितीने अंतिम निर्णय दिलेला आहे, परंतु सदर अंतिम निर्णय देण्यापुर्वी उपविभागीय स्तरीय समितीने अथवा जिल्हास्तरीय समितीने यथास्थिती दावेदाराच्या / ग्रामसभेच्या शिफारशीमध्ये फेरबदल केले असतील अथवा दावा फेटाळला असेल व याबाबत संबंधित दावेदारास लेखी ज्ञापनाव्दारे ( Speaking Order) कळविले नसेल तर अधिनियमातील तरतूदीनुसार सदर दावा निकाली काढला आहे असे म्हणता येणार नाही. यास्तव ज्या प्रकरणात अधिनियमातील तरतूदींनुसार वर नमूद केल्याप्रमाणे विहीत प्रक्रिया पार पाडली गेली नसेल व दावेदाराने उपविभागीय स्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समितीकडे अपील सादर केलेले असेल तर सदर अपिल संबंधित प्राधिकरणाने दाखल (Admit) करून घेणे गरजेचे आहे, व त्यावर कलम ६ तसेच नियम १४ किंवा १५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे

अशा प्रकारे वनहक्क कायदा अधिनियम व नियमातील विषद केलेली प्रत्येक टप्पानिहाय प्रक्रिया पार पाडण्यासाठी सदर दाव्याची पुर्नतपासणी करण्याचे आदेश जिल्हास्तरीय समिती, ग्रामस्तरीय वनहक्क समिती व उपविभागीय स्तरीय समितीस देवू शकेल.

तसेच सुधारीत नियम, २०१२ मधील अ.क्र. ४ येथील नियम ३ (४) ही तरतुद ग्रामस्तरीय वनहक्क समितीशी संबंधीत आहे. सदर तरतुदीने उपविभागीय स्तरीय समिती /जिल्हास्तरीय समिती यांना अपिल दाखल करून घेण्यास प्रतिबंध केलेला नाही व सदर प्राधिकरणांनीही यथास्थिती नियम १४ व १५ नुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

आपला,

सोबत:- वरीलप्रमाणे.

(नि. अ. पांढेरकामे)
अवर सचिव

प्रत,

मा.अपर मुख्य सचिव, महसूल व वन ( महसूल ), मंत्रालय, मुंबई.

मा. प्रधान सचिव, महसूल व वन ( वने ), मंत्रालय, मुंबई.

मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

मा. सचिव, मा. राज्यपाल कार्यालय, राजभवन [illegible]

Generated by CamScanner